# प्रेसनोट

जा.क्र. ५२९ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः— २४/०७/२०१७

## स्कुल बस सुरक्षितता — कायदयाची काटेकोर अमलबंजावणी करण्याचे मा.जिल्हा पोलीस अधिक्षकांचे आदेश

भंडारा :— आज दिनांक २४/०७/२०१७ रोजी जिल्हा स्कुल बस सुरक्षितता समितीची सभा पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता एस यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पोलीस मुख्यालयात पार पडली. सदर सभेत समिती सदस्य/ सचिव श्री. प्रशांत झाडे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा पोलीस निरीक्षक वाहतुक नियत्रंण भंडारा श्री. गाडे, जिल्हा परीषद नगर परीषद शिक्षण विभाग व राज्य परिवहन मंडळाचे प्रतिनिधी हजर होते.

सदर सभे मध्ये मा. पोलीस अधिक्षक विनीता एस यांनी स्कुल बस सुरक्षिततेकरीता उपप्रादेशिक परिवहन पोलीस विभाग व अन्य विभागाकडुन करण्यात आलेल्या कार्यवाही व उपाय योजनांचा आढावा घेतला व स्कुल बस तसेच अन्य मोटार वाहनांतुन करण्यात येणारी शालेय विद्यार्थ्यांची वाहतुक व सुरक्षितता हा अतिशय संवेदनशिय असुन याअनुसंघाने पारीत करण्यात आलेले कायदे, शासनाकडुन प्राप्त परिपत्रके बनविण्यात आलेले नियम व सर्वोच्च न्यायालयाने घालुन दिलेली मार्गदश्न तत्वे यांची काटेकोरपणे अमलबजावणी करण्याचे आदेश सर्व विभागांना दिले. त्यानुसार विद्यार्थी वाहतुक करणाऱ्या स्कुल बसची सुरक्षितता ही संबंधित स्कुलच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांची जवाबदारी असुन स्कुल बस मध्ये प्रथम उपचार पेटी, अग्नीशमन साधने असणे आवश्यक आहे. स्कुल बसचा वेग तासी ४० कि.मी पेक्षा अधिक असणार नाही तसेच निश्चीत केलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतुक केली जाणार नाही प्रत्येक स्कुल बस मध्ये महिला किंवा पुरुष अटेडेंन्ट असावा. प्रत्येक स्कुलने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरीता ट्रॉफीक वार्डन नेमावे शाळेने स्कुल बसमधील विद्यार्थ्यांचा जीवन विमा काढणे आवश्यक आहे. तसेच स्कुल बस चालकांची नियीमत वैदयकीय तपासणी होणे आवश्यक आहे.

चालकाकडे बस मध्ये सर्व विदयार्थाची नाव, पत्ते, ब्लड ग्रुप इ. ची. यादी असणे बंधनकारक आहे. अशी मार्गदर्शक तत्वे असुन विना नोंदणी स्कुल बसेस, विना परवाना गैर कायदेशिर पणे गॅस सिट बसवुन विद्यार्थी वाहतुक करणाऱ्या ओमनी व्हॅन, गैरकायदेशिरपणे विद्यार्थी वाहतुक करणाऱ्या ॲटोरिक्षा यांचे विरुध्द संयुक्त माहिम राबवुन कायदयाची काटेकोरपणे अमलबजावणी करणाऱ्या सुचना उपप्रादेशिक परिवहन विभाग व पोलीस विभागास दिल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरीता सर्व शाळांना त्याचे परिसरात, त्याच प्रमाणे स्कुल बस मध्ये सिसीटीव्ही लावण्याबाबत प्रोत्साहित करावे. अश्या सुचना जिल्हा परीषद व नगर परिषद शिक्षण विभागास दिल्या.

पोउपनि. (जे. एन. लाकडे)
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४०३४३८५४६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत. संगणक कक्ष.** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.